## श्री. ह. मो. मराठे यांना ‘अंतराळ’कडून भावपूर्ण श्रद्धांजली!



ज्येष्ठ साहित्यिक श्री. ह. मो. मराठे यांचे २ ऑक्टोबर २०१७ रोजी वयाच्या सत्त्याहत्तराव्या वर्षी पुण्यात निधन झाले. लेखक व संपादक या नात्याने त्यांनी साठ वर्षे साहित्यप्रवास केला. ’बालकाण्ड’ आणि ’पोहरा’ हे त्यांच्या आत्मचरित्राचे दोन भाग आहेत. सुप्रसिध्द व्यक्तींच्या सहवासात एखादा दिवस घालवून त्याबद्दल लिहिलेले ’एक माणूस एक दिवस’ या लेखमालिकेतले त्यांचे लेख अतिशय गाजले. त्या लेखांची पुस्तकेही लोकप्रिय झाली. 'दोन स्पेशल' हे नाटकही 'हमों'च्या 'न्यूज स्टोरी' या कथेवर आधारित आहे.

जन्म : १९४०

निधन : २ ऑक्टोबर २०१७